वाचले :-

१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१)

२) शहर अभियंता, स्थापत्य विभाग यांचेकडील पत्र क्र. स्था/अस्था/९/कावि/१५५/२०२६, दिनांक २८/१०/२०२६

३) अधिकार प्रदान आदेश क्रमांक साप्रवि/२/कावि/४५८/२०२६ दिनांक ०३/१०/२०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१/कावि/ ३८० /२०२६
दिनांक २५ / ११ /२०२६

विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत...
श्री.तापकीर दामू विठ्ठल,पदनाम - उप अभियंता (स्था) (संगणक क्र. ७४१७)

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर श्री.तापकीर दामू विठ्ठल हे 'स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक' या पदावर दिनांक २३/०९/१९९८ रोजी रुजू झाले असून सद्यस्थितीत 'उप अभियंता (स्था)' या गट 'ब' च्या पदावर कार्यरत आहेत. श्री.तापकीर दामू विठ्ठल यांची जन्मतारीख ०५/०१/१९६९ अशी असून दिनांक ०४/०१/२०२७ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्षे पूर्ण होत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) मधील तरतूदीनुसार श्री.तापकीर दामू विठ्ठल, उप अभियंता (स्था) यांना दिनांक ३१/०१/२०२७ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.तापकीर दामू विठ्ठल, उप अभियंता (स्था) यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घर दुरुस्ती कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, कामगार कल्याण निधी अग्रिम, विनावेतनी निरंक व मनपा सेवकांची सहकारी पतसंस्था दाखला येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेने उपरोक्त वाचले क्र. २ चे पत्रान्वये संबंधित विभागप्रमुखांनी सेवानिवृत्तीबाबत स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये विभागप्रमुखांची शिफारस, महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतूद विचारात घेता, तसेच उपरोक्त वाचले क्रमांक ३ चे आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्री.तापकीर दामू विठ्ठल, उप अभियंता (स्था) यांना दिनांक ३१/०१/२०२७ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यास, प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे.

श्री. तापकीर दामू विठ्ठल, उप अभियंता (स्था) यांना निवृत्तिवेतन,सेवा-उपदान इ.रकमा अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता सबंधित विभागाने करून प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे. लेखा विभागाने श्री.तापकीर दामू विठ्ठल, उप अभियंता (स्था) यांचेकडून महापालिकेस घरबांधणी कर्ज, घर दुरुस्ती कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, कामगार कल्याण निधी अग्रिम व मनपा सेवकांची सहकारी पतसंस्था दाखला इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय ? या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास, ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.तापकीर दामू विठ्ठल, उप अभियंता (स्था) यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

Digital Signature
Signature Valid
Name : KHOT SANDEEP DADASAHEB
Designation:Deputy Commissioner
Location:.
Date :25-11-2026 13:49

प्रती - 1) श्री.तापकीर दामू विठ्ठल, उप अभियंता (स्था), स्थापत्य विभाग 2) लेखा विभाग २/- श्री.तापकीर दामू विठ्ठल, उप अभियंता (स्था) यांचेकडून महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम त्यांना देय असणा-या रकमेतून वजा करुन उर्वरित रकमा त्यांना त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करणेत यावी. १.लेखापरिक्षण विभाग २.दूरसंचार विभाग ३.माहिती व जनसंपर्क विभाग ४.कामगार कल्याण विभाग ५.माहिती व तंत्रज्ञान विभाग ६.सामान्य प्रशासन टेबल क्र. ७, ९, १०, १२, १३, १६, २२, संगणक कक्ष (साप्रवि) ७.पिं.चिं. मनपा कर्मचारी महासंघ ८.पिं.चिं.मनपा कर्मचारी पतसंस्था ९.सर्व संबंधित विभाग

प्रत -